सोमवार दि.२ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३६३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे




Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी मविआचं जोडे मारो आंदोलन

## ठाकरे-पवारांसह शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

–सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या घटनेने महाराष्ट्र हळहळला. २६ ऑगस्टला ही घटना घडली. ज्यानंतर सरकावर आरोपांच्या फैरी झाडण्यात आल्या. आता याच घटनेचा निषेध म्हणून मुंबईत जोडे मारो आंदोलन करण्यात येतं आहे. महाविकास आघाडी या प्रकरणी आक्रमक झाली आहे. तुरुंगात टाकलं तरीही चालेल पण आंदोलन होणारच असा पवित्रा महाविकास आघाडीने घेतला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह तिन्ही पक्षांचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा स्वाभिमान त्यांचा अवमान आम्ही खपवून घेणार नाही, असं म्हणत महाविकास आघाडीचे शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरलं आहेत. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष केला. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' असं म्हणत शेकडो कार्यकर्ते गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाले. तसंच गद्दारांना माफी नाही, शिवद्रोहींना माफी नाही अशा घोषणाही यावेळी देण्यात आल्या.

मविआच्या या मोर्चाला पोलिसांनी परवानगी दिली नव्हती. मात्र आज रविवारचा दिवस आहे. या भागातील कार्यालयांना सुट्टी आहे. असं असताना आमच्या आंदोलनाला परवानगी का नाही? असा सवाल महाविकास आघाडीने केला. त्यानंतर हा मोर्चा अडवला जाणार नाही, अशी भूमिका पोलिसांनी घेतली. लावलेले बॅरिगेटही हटवण्यात आले आहेत. हा मोर्चा आता गेट वे ऑफ इंडियाच्या दिशेने रवाना झाला. उद्धव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांच्यासह शेकडो कार्यकर्ते या मोर्चात सहभागी झाले आहेत.चत- गेवश चरी -पवेश्ररप उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवाजी महाराजांचा पुतळा हवेतून कसा पडला? राज्यात भ्रष्टाचारात गुंतलेले सरकार सुरू आहे. स्मारकाच्या कामात कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला आहे. पुनर्बांधणीच्या नावाखाली करोडोंचा भ्रष्टाचार होणार आहे. मी त्यांना शिवाचा गद्दार म्हणेन. शरद पवार म्हणाले की, पुतळ्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. राज्य सरकार आपल्या जबाबदारीपासून पळ काढू शकत नाही. ही बाब गंभीर आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सिंधुदुर्गात पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी स्वत: पंतप्रधान मोदी, संरक्षणमंत्री आणि मुख्यमंत्री आले होते. मूर्ती बनवण्याचा नियम आहे, परवानगी घ्यावी लागते. हे शिवविरोधी लोक आहेत. सरकारच्या चुकीच्या धोरणांचे कारण आणि डीजी पदावर महिला अधिकाऱ्याची नियुक्ती का करण्यात आली आहे. डीजी रश्मी शुक्ला भाजप आणि आरएसएसचा अजेंडा चालवत आहेत.

### अमृतमहोत्सवी संविधान स्विकृती दिवस सोहळ्याच्या

# आयोजनाप्रित्यर्थ साहित्यधारा बहुउद्देशीय संस्था औरंगाबादच्या वतीने बुलढाणा येथे बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा | ज्ञानेश्वर बुधवत



दि. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारत देश ब्रिटिश गुलामीतून स्वतंत्र झाला परंतु देशाला स्वत:चे संविधान नव्हते. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून दि. २६ नोव्हेंबर, १९४९ ला राष्ट्राला अर्पण केले. अर्थात त्या ऐतिहासिक दिवशी भारत देशातर्फे सदर संविधानाचा स्विकार करण्यात आला. आणि नंतर दि. २६ जानेवारी, १९५० ला ते संविधान देशाला लागू करण्यात आले. मात्र संविधान दिवसाचा प्रथम सोहळा दि. २६ नोव्हेंबर, २०१५ या दिवशी देशात साजरा करण्यात येवून त्या दिवसापासून दि. २६ नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी देशात संविधान दिवस म्हणून राष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो. आणि यावर्षी दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी, देशाने संविधान स्विकृत केल्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने या वर्षीच्या सोहळ्याला एक आगळे वेगळे महत्त्व असल्याकारणाने, तो दिवस अवर्णनीय व अभिनव पद्धतीने कसा साजरा करता येईल यावर सखोल तथा सविस्तर चर्चा करण्यासाठी दि. ३१-०८-२०२४ रोजी दुपारी साहित्यधारा बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद/छत्रपती संभाजीनगर च्या वतीने बुलढाणा येथील हॉटेल नैवेद्यम येथे एक बैठक आयोजित करण्यात येवून त्यावर चर्चा करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा स्कॉटलंड यार्ड चे स्टुडंट्स ब्रांड म्बेसेडर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, ( औरंगाबाद ) छ. संभाजीनगर मधील अर्थशास्त्र विभागाचे प्रा.डॉ. संघर्ष सावळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या बैठकीत सदर कार्यक्रम अविस्मरणीय कसा करता येईल यावर महत्त्वाची चर्चा झाली. या बैठकीत अंतर्राष्ट्रीय कवी संमेलन अध्यक्षपद भूषविलेले तथा ज्यांची कविता अंतर्राष्ट्रीय स्तरावर गाजत आहे असे ख्याती प्राप्त सुप्रसिद्ध कवी तसेच सामाजिक कार्यासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, अंतर्राष्ट्रीय पर्यावरण संरक्षण संस्थेच्या विदर्भ विभाग प्रमुख तथा ज्येष्ठ कवी व सामाजिक कार्यकर्त्या आयु. शीतल शेगोकार, शेगाव, डॉ. राजू हिवाळे, बुलढाणा, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदेव तायडे, मलकापूर, आयुष्मान एस. एम. शिंदे, मलकापूर, विधिकर्ता अंकुश पडघान, बोरगाव काकडे, चिखली, सामाजिक कार्यकर्त्या आयु. मंगला गर्दे, नांदुरा तथा आयु. वैशाली तायडे, खामगाव ईत्यादींनी सदर चर्चेत सहभाग नोदविला.

# एका चिरकाल तारूण्याचा हार्दिक गौरव



■ लोकनेता न्यूज नेटवर्क


बुलढाणा | ज्ञानेश्वर बुधवत

दि. ३१-०८-२०२४ रोजी बुलढाणा जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष तथा लोकप्रिय जिल्हा पोलीस अधीक्षक मा. सुनील कडासने यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आज त्यांच्या निवासस्थानी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभेच्छा देताना त्यांचे मित्र तथा स्कॉटलंड यार्ड स्टुडंट्स ब्रांड म्बेसेडर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर ( औरंगाबाद ) चे प्राध्यापक तसेच साहित्यधारा बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद चे अध्यक्ष, डॉ. संघर्ष सावळे, ज्येष्ठ विधिज्ञ तथा बहुजन साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष व अंतर्राष्ट्रीय कविसंमेलनाचे नेपाळ मधील अध्यक्षपद भूषविलेले डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, सामाजिक कार्यकर्ते आयुष्मान ज्ञानदेव तायडे तथा आयुष्मान एस. एम. शिंदे मलकापूर, डॉ. राजू हिवाळे, बुलढाणा, कवी अंकुश पडघान, चिखली, अंतर्राष्ट्रीय पर्यावरण बहुउद्देशीय संस्थेच्या विदर्भ सचिव आयु. शीतल शेगोकार, शेगाव, सामाजिक कार्यकर्त्या आयु. मंगला गर्दे, नांदुरा तथा वैशाली तायडे, खामगाव ई.

# मंठा-परतूर तालुक्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी-ए.जे बोराडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मंठा | प्रतिनिधी



परतूर तालुक्यासह नेर सेवली भागात रविवार १ सप्टेंबरच्या सकाळपासून अतिवृष्टी सुरू आहे. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी संदर्भात जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी जिल्हाधिकारी जालना यांना तात्काळ संपर्क करून ही मागणी केली आहे. रात्रीपासूनच अतिवृष्टी सुरू आहे. या भागात पावसाने थैमान घातले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कापूस, सोयाबीन, तूर आदी पिकांसह फळबागाचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या अतिवृष्टीमुळे हिरावून घेतला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ शासनाने पंचनामे करून आपला अहवाल शासनाकडे पाठवावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी केली आहे.

# अखेर वाळवंटाचे स्वरूप आलेल्या सिंदखेड राजा तहसिलचा वनवास संपला

## अजित दिवटे हे स्विकारणार तहसीलदार पदाचा पदभार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा | प्रतिनिधी






गवळ्या खेटी पवळा बांधला, गुण नाही पण वान लागला... अशा पद्धतीने सिंदखेड राजा तहसील चे कामकाज सुरू असल्याचे वारंवार समोर आले. सिंदखेड राजा तहसीलचे तहसिलदार दि. १२ एप्रिल रोजी सचिन जैस्वाल यांची अवैध गौण खनिज प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केल्या नंतर दि. १५ एप्रिल रोजी प्रभारी तहसिलदार प्रविण धानोरकर यांनी कार्यभार स्वीकारला. त्यानं नंतर त्यांनी शिवळावर पडल्याप्रमाणे आपला कार्यभार ऑगस्ट अखेरीस आणला.

नुकत्याच निघालेल्या महसूल व वन विभाग शासन निर्णयामध्ये अजित हणमंत दिवटे यांची सिंदखेड राजा येथे तहसिलदार म्हणून निवड झाली असून ते तत्काळ सिंदखेड राजा तहसीलचे सूत्र हाती घेतील. त्यांच्या कार्यकाळात ते सिंदखेड राजा तहसीलचा एक नवा चेहरा म्हणून पुढे येतील. वस पडलेल्या तहसिलचे दिवस आता तरी बदलतील आणि अनेक महिन्यांपासून रखडलेली काम मार्गाला लागतील. अशी एक माफक अपेक्षा सर्वांच्या मनात आस धरून आहे.

### मात्र तहसिलदार धानोरकर यांचे अवैध व्यवसायिकांना अभय

दि. १५ एप्रिल रोजी तहसिलदार धानोरकर यांनी कार्यभार स्वीकारला आणि आता प्रभारी म्हणून का होईना एक नवा तरुण तहसिलदार सिंदखेड राजा तहसिल ला मिळाला म्हणून सर्वांचे काम मार्गी लागेल असा अट्टाहास सर्वांनी धरला होता. मात्र त्यांनी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे करण्यासाठी वाव दिल्याचं लवकरच पुढं आले. म्हणूनच त्यांना देखील अनेक तक्रारीचा सामना करावा लागला तो केवळ अवैध व्यवसायामुळे. नव्हे नव्हे तर तहसिलदार धानोरकर यांचा देखील वसुलीला एक माणूस असल्याची माहिती देखील समोर आली होती. परंतु दैनिक लोकनेता ने त्याच्या सोबत संपर्क केला असता काही कारणास्तव मी एक महिना सुट्टीवर असल्याचं त्या व्यक्तीने सांगितले.

# राज्यभरात मुसळधार पावसाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

सप्टेंबर महिन्यासुध्दा पावसाचा जोर कायम असणार आहे. आज महिन्याच्या पहिल्याच दिवशी राज्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार विदर्भातील काही जिल्ह्यांना आज रेड अलर्ट तर काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. आज विदर्भ, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. दरम्यान पुणे वेध शाळेने दिलेल्या माहितीनुसार, आज अति तीव्र कमी दाबाचे क्षेत्र ईशान्य बंगालच्या उपसागरावरून वायव्य अरबी समुद्रात आहे. तर ठळक कमी दाबाचे क्षेत्र हे पश्चिम बंगाल मध्ये व लगच्या वायव्य बंगालच्या उपसागरावर आहे. आज कोकण गोवा व विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.नागपुरात सोसाट्याच्या वाऱ्यासह दमदार पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नागपूर,चंद्रपूर,आणि यवतमाळ या जिल्ह्यांना १ सप्टेंबर रोजी रविवारी पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. अमरावती वर्धा आणि गडचिरोलीला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.पश्चिम व मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील तुरळक ठिकाणी १-२ सप्टेंबर रोजी पावसाची शक्यता आहे. तर, कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात १ ते ६ सप्टेंबर दरम्यान जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

# आष्टी मतदारसंघाला भिमराव धोंडे यांच्या नावाची गरज बोधले महाराज

## सत्याचा विजय होत असतो-विठ्ठल महाराज

## शेतीपुरक उद्योग उभारावेत-भिमराव धोंडे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदार संघाला भिमराव धोंडे यांच्या नावाची गरज आहे. एवढ्या ताकदीचे व्यक्तीमत्व मतदारसंघात दुसरे नाही. शेतकरी आणि शिक्षण या दोन महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे माजी आमदार भीमराव यांचा श्वासोच्छ्वास आहे असे ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांनी सांगितले.आपण मतदारसंघासाठी मोठे कार्य केले आहे याचे फळ निश्चित मिळेल. सत्य सत्यच असते, सत्याचा विजय होत असतो असे ह.भ.प. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, लोकसंख्येच्या तुलनेत आज प्रत्येक व्यक्तीला सरासरी दोन ते तीन एकर जमिन मिळू शकते, भविष्यात ही परिस्थिती गुंठ्यांवर येईल त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून ज्ञान आत्मसात करीत शेती पुरक उद्योग उभारावेत.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री. छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर, कृषी महाविद्यालय आष्टी यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शनाचा गहिनीनाथ गडाचे मठाधिपती हभप विठ्ठल महाराज शास्त्री व अखिल भारतीय वारकरी मंडळाचे अध्यक्ष हभप प्रकाश महाराज बोधले यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी समारोप झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयोजक माजी आमदार भीमराव धोंडे हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे, चेअरमन राजेश धोंडे,अभयराजे धोंडे,विठ्ठल आण्णा बनसोडे, जिल्हा कृषी अधिकारी बाबासाहेब जेजूरकर, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, जेष्ठ संपादक प्रा. अनंतराव हंबर्डे, ह.भ.प. दिनकर तांदळे महाराज, रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, संजय कांकरिया, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, भाऊसाहेब सायंबर, दिलीपराव काळे,बाजीराव वाल्हेकर, बाजार समितीचे संचालक आण्णासाहेब लांबडे,माजी गटशिक्षणाधिकारी श्रीराम टेकाळे, व इतर उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून पुढे बोलताना हभप प्रकाश महाराज बोधले यांनी सांगितले की, सरकारी योजना कशा राबवाव्यात हे महाराजांकडून शिकावे. कृषी क्षेत्रात स्वामिनाथन यांचे नांव लौकिक आहे. कृषी प्रदर्शन पाहून शेतकऱ्यांची भावना बदलून अनेकांना कृषी पुरक व्यवसाय करण्यासाठी मत परिवर्तन होईल. खेळ पैठणीच्या कार्यक्रमाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, प्रत्येकाने एकदा तरी आपल्या सौभाग्यवतीला पैठणी घ्यावी. सर्वसामान्य लोकांना रोख स्वरूपात मदत नको तर शिक्षणाच्या माध्यमातून भिमराव धोंडे मदत करतात. त्यांनी शिक्षणासोबत नाळ जोडलेली आहे. युवा नेते अजयदादा धोंडे यांच्या विषयी बोलताना बोधले महाराज म्हणाले की, ते होतकरू युवा नेते आहेत त्यांना धोंडे हे नांव कायम पुढे न्यायचे आहे. भविष्यात तुम्ही यशस्वी व्हाल असे आशिर्वाद दिले.

अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राची ओळख निर्माण झालेली आहे. साधु संतांनी देखील शेतीचे महत्व सांगितले आहे. शेतीवर प्रकाश टाकण्यासाठी कायमच वारकरी संप्रदायाने काम केले डॉ. स्वामीनाथन यांच्या कृषी क्षेत्रातील कामामुळे त्यांची जगभरात ख्याती आहे. त्यांनी जादा उत्पादन देणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या पिकाच्या जातीचे संशोधन केले. भारताचे पंतप्रधान मोदी यांनी देखील एक हजार शास्त्रज्ञांना कामाला लावून असे संशोधन करा की ज्यातून कमी पाण्यावर,कमी कालावधीत ज्यादा उत्पन्न कसे मिळेल यासाठी काम करावे. पुढील दहा वर्षात सर्वच पिकांची उत्पादन क्षमता वाढलेली दिसेल असे बियाणे भविष्यात येईल. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतीपूरक व्यवसाय शेतकऱ्यांनी उभारावेत. महाराष्ट्राच्या अनेक भागातून कृषी प्रदर्शनासाठी स्टॉल आले होते.राज्यातील सर्वात मोठा सांगली येथील खिल्लार जातीचा बैल देखील आला होता. हजारो विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली या भावी पिढीला प्रदर्शनाचा भविष्यात निश्चित फायदा होईल. आपला मतदारसंघ हा ऊस तोडणी कामगारांचा आहे. मला नेहमी वाटते की आपल्या भागातील लोकांची ऊस तोडणी पासून मुक्तता होऊन त्यांचे भविष्य चांगले झाले पाहिजे. यासाठी मी नेहमी प्रयत्न करतो. शिक्षण क्षेत्रात थोडेफार काम केलेले आहे. भविष्यात आणखी करायचे आहे आणि ऊसतोड कामगारांचे जीवन बदलण्यासाठी मी सतत प्रयत्न करीत राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.


हभप विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सांगितले की, डॉ. स्वामीनाथन यांचे देशातील शेतकऱ्यांसाठी मोठे योगदान आहे. त्यांनी जादा उत्पन्न देणारे विविध पिकांचे वाण शोधून काढले. मा आ भिमराव धोंडे यांनी गहिनीनाथ गडाच्या दिंडीला सुरुवातीला श्री क्षेत्र अरण येथे दोन हजार रुपये दिले होते, त्यानंतरच्या वर्षी केळीचा नाष्टा दिला आणि त्यानंतरच्या वर्षांपासून ते गहिनीनाथ गडाच्या दिंडीतील लाखों वारकऱ्यांना जेवण देतात. त्यामुळे भिमराव धोंडे यांना गहिनीनाथ महाराज व वामन भाऊ यांचे आशिर्वाद आहेत.शेतकऱ्यांसाठी दिल्ली पर्यंत पायी गेले.कृषी प्रदर्शनाची सर्वत्र चर्चा झाली आहे.आपण हे मोठे कार्य केले आहे याचे फळ निश्चित मिळेल. सत्य सत्यच असते,सत्याचा विजय होत असतो. यावेळी स्वागताध्यक्ष व अजयदादा धोंडे यांनी सांगितले की, आपला भाग दुष्काळी आहे, यंदा चांगला पाऊस झाला आहे. प्रदर्शनाच्या निमित्ताने निसर्गाने चांगली साथ दिली. महिलांसाठी आयोजित खेळ पैठणीच्या कार्यक्रमास तीन हजारांवर महिलांनी हजेरी लावली. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी धोंडे साहेब विधानसभा निवडणुक लढविणार आहेत त्यासाठी आपण सर्वांनी पाठीमागं उभे राहण्याची गरज आहे.

प्रा. अनंतराव हंबर्डे यांनी सांगितले की,मा आ भिमराव धोंडे यांच्या श्वासात शेतकरी आणि शेतकरीच आहेत. सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन चालतात.डॉ. स्वामिनाथन यांनी देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. भिमराव धोंडे यांच्या शेतकरी संस्थेत शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आज वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत.शेतकरी कधीच बेइमानी करीत नाहीत.मी पहिल्या निवडणुकीपासुन त्यांच्या सोबत आहे आणि उद्याही मी त्यांच्या सोबत राहणार आहे. त्यांच्या हातून एकदा चुक झाली आहे, त्यातून शिकायचे असते असेही सांगितले.पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की,माजी आमदार भीमराव धोंडे यांचा स्वभाव सरळ आणि शांत आहे.काही लोक त्यांच्या शांत स्वभावाचा फायदा घेतात. हा स्वभाव आता बदलावा आणि भविष्यात काहींची चांगलीच जिरवा असे सांगितले.तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी सांगितले की, कृषी प्रदर्शनामुळे मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडली.त्यांना नवनवीन माहिती मिळाली.यातून शेतकरी समृद्ध होण्यासाठी मदत होईल माजी आमदार भीमराव धोंडे यांनी प्रत्येक वर्षी अशाच प्रकारे चांगल्या प्रकारचे कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात यावे. रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे यांनी भिमराव धोंडे यांचा भावी आमदार असा उल्लेख केला यावेळी कु.भक्ती गिरी या विद्यार्थ्यांनीने देखील उत्कृष्ट भाषण केले. कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शंकरराव देशमुख डॉ.विश्वास मुळे,महाराष्ट्र केसरी सईद चाऊस,ग्रा.पं.सदस्य आदेश निमोनकर,युवा नेते आस्ताक शेख,हादी शेख,रघुनाथ शिंदे, बाबुराव कदम,विठ्ठलराव लांडगे, डॉ. मनोज पाचे,माजी सभापती अनिल जायभाय,सदाशिव दिंडे, सेवानिवृत्त पीएसआय शेख,बबन सांगळे, कुंडलिक आस्वर, कोंडीबा साबळे यांच्या सह, संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ बी राऊत,प्रा.शिवदास विधाते, माऊली बोडखे,संजय शेड़े तसेच शेतकरी व कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य श्रीराम आरसुळ यांनी सांगितले की,एक लाख तीन हजार शेतकऱ्यांनी भेटी दिल्या तसेच तालुक्यातील सुमारे ५५ शाळेतील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भेटी दिल्या तसेच जवळपास १० कोटी रुपयांची उलाढाल झाली.त्याचप्रमाणे चार ट्रॅक्टर व एक फवारणीचे ब्लोअर विकले गेले.विविध प्रकारचे एकुण ११० स्टॉल सहभागी झाले होते.स्व.बापुराव धोंडे याच्या स्मरणार्थ कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांमधून लकी ड्रॉ काढण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश दिवटे व प्रा. खेमकर यांनी केले.उपस्थितांचे आभार प्रा पी.आर.काळे यांनी मानले.

# निखळ हसणं माणूस विसरला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**



माणूस मोबाईल मध्ये बघून हसेल पण आपल्या माणसाशी बोलणार नाही. कारण माणूस मोबाईल मध्ये विनोदी व्हिडिओ बघताना मनमोकळे हसतो पण, शेजारी बसलेल्या आपल्या माणसाशी संवाद साधत नाही.आज घराघरातील ही सत्य परिस्थिती आहे.सतत पुढे जाण्याच्या घाईत स्पर्धेत टिकून राहण्यासाठी जबाबदारी पूर्ण करता-करता माणूस मनमोकळपणाने हसायला विसरला आहे. सध्या स्पर्धात्मक जगात शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी,व्यावसायिक, नोकरदार,गृहिणी, सीनियर सिटीजन सर्व वयोगटातील लोकसंख्या वेगवेगळ्या कारणामुळे मानसिकता तणावाखाली आहे. ध्येयामागे धावताना स्पर्धेचा सामना करताना दिसतात.ज्या नैसर्गिक गोष्टी जपून ठेवल्या पाहिजे त्या मागे पडताना दिसत आहे.घरातील सदस्य जेव्हा एकत्र येतात तेव्हा एकमेकांशी संवाद साधताना मोबाईल मध्ये डोकावत राहणे याची माणसाला सवय लागली आहे. कुणाचा मेसेज, स्टेटस बघण्याची उत्सुकता जेवढी असते तेवढी उत्सुकता आपल्या माणसाची बोलताना नसते.हसणे,रडणे, आनंद,दुःख,राग,उदास होणे या नैसर्गिक क्रिया आहेत.कोणतीही भावना कोणतीही क्रिया प्रमाणात असली की चांगले असते.रडल्यावर जसे मोकळे हलकेफुलके वाटते तसे हसल्यावर मन प्रफुल्लित राहते.त्याने चेहऱ्याचे स्नायू मोकळे होतात.त्यातून मोकळेपणाने हसणे लहान लहान गोष्टी मधून आनंद मिळवणे महत्त्वाचे आहेत. हसण्याने मन प्रफुल्लित व प्रसन्न राहते. सकारात्मक दृष्टिकोन वागण्यात बोलण्यात मेंटेन ठेवायचा असेल तर, हसणे खूप महत्त्वाचे आहे.यासाठी मित्र-मैत्रिणीची गप्पा मारून, वाचन चित्रपट बघून आनंद मिळवता येतो. परंतु असे घडत नाही कारण माणसापासून माणूस दूर गेलेला आपल्याला दिसतोय पूर्वी मित्र मैत्रिणी नातेवाईक एकत्र आल्यावर गप्पागोष्टी करताना डोळ्यातून पाणी येईपर्यंत मनमोकळेपणाने हसले जाई पण,आता मोबाईल मध्ये विनोदी व्हिडिओ बघून माणूस एकटाच हसत बसतो.माणूस माणसापासून दूर गेल्याने हसण्यासाठी कृत्रिम माध्यमाचा सहारा घ्यावा लागतो. ही दुर्दैवी बाब आहे.दिवसेंदिवस ही बाब जास्तच गंभीर होत चालली आहे.



विशाल वामन गुजर
उप-मुख्याध्यापक:-बालाजी विद्यालय,वालसावंगी


# वसाहत बागपिंपळगाव केंद्राची शिक्षण परिषद संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

केंद्र वसाहत बागपिंपळगाव येथील श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत केंद्रप्रमुख नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न.

केंद्र वसाहत बागपिंपळगाव या केंद्रा अंतर्गत १२ शाळा येतात या १२ शाळेतील प्राथमिक शिक्षकांची केंद्र प्रमुख नामदेव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शुक्रवार ३० रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी श्री संत भगवानबाबा शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी केंद्र प्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक यांनी या शैक्षणिक वर्षात सुरू असलेल्या शैक्षणिक कामाचा शिक्षका कडून आढावा घेऊन. शिक्षकांना अध्ययन निष्पत्ती त्यातील स्तर या विषयी सांगून शिक्षकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थी प्रगत होण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करावे. तसेच आपल्या केंद्रातील सर्व शाळेनी शंभर टक्के महावाचन चळवळ अभियानाचे रजिस्ट्रेशन करुन नाव नोंदणी करावी. नवोदय परिक्षेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थी प्रविष्ठ करावे या व अशा सुचना यावेळी शिक्षकांना दिल्या. या शिक्षण परिषदेसाठी ४९ शिक्षक हजर होते. या शिक्षण परिषदेत निकाळजे अशोक, कुटे दयावान व कुलकर्णी सोनाली यांनी सुलभक म्हणून काम केले. या प्रसंगी नवनियुक्त ट्रेनी शिक्षकांचा सत्कार केंद्रप्रमूख नामदेव शिंदे यांनी केला. तसेच ट्रेनी शिक्षकांनी प्रामाणिक पणे काम करून आपले वेगळेपण दाखवावे असे सूचवले. शिक्षण परिषद यशस्वीपणे पार पडण्यासाठी श्री संत भगवानबाबा विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. या शिक्षण परिषदेसाठी उपस्थित शिक्षकांचे आभार दयावान कुटे यांनी मानले व शिक्षण परिषद आनंदात पार पाडण्यात आली.



# डॉ.अण्णाभाऊंच्या विचाराचे वारसदार व्हा-विजय रणखांब

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

समाजातील तरुणांनी शिक्षणाची कास धरून अण्णाभाऊचे परिवर्तनवादी विचारांचे व साहित्याचे वारसदार व्हा असे मार्गदर्शन लसाकमचे नांदेड जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी व्यक्त केले.

बामणी तालुका कंधार येथे आज सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायणराव तेलंग, प्रमुख अतिथी म्हणून शिवा नरंगले, शंकर कदम, गोविंद पवार, सोसायटी चे अध्यक्ष रविदास सांगळे, माजी सैनिक उत्तम वाघमारे, पत्रकार शाम कांबळे, हनुमंत कदम, उद्धव तेलंग, सरपंच प्रतीमा शिंगारपुतळे , प्रशांत तेलंग उपस्थित होते.तर प्रमुख वक्ते म्हणून नांदेड लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब उपस्थित होते.यावेळी समाजाने अज्ञानमुक्त ,आळस मुक्त अंधश्रद्धा मुक्त झालं पाहिजे ही काळाची गरज आहे.असे सांगुन आता समाजासाठी आरटी ची स्थापना झालेली आहे आपल्या समाजातील मुलं उच्च शिक्षण घेऊन अधिकारी बनले पाहिजे याकडे सर्व पालकांनी लक्ष देण्याची गरज असल्याचे मनोगत नांदेड जिल्हा लसाकमचे जिल्हाध्यक्ष विजय रणखांब यांनी व्यक्त केले आहे. समाजातल्या बेरोजगारांनी अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या कर्जाचा लाभ घेतला पाहिजे असेही त्यांनी सांगितले.यावेळी शिवा नरंगले यांनीही डॉ.अण्णाभाऊ साठेच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले .या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



## नांदेड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी ; नागरिकांना सतर्कतेचा इशारा

# १२ जनावरांचा मृत्यू ; २५ घरांची पडझड पाऊस थांबताच शेती व अन्य पंचनामे करणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

किनवट, हिमायतनगरमध्ये अधिक पाऊस प्रकल्प भरले ; धरणाखालील नागरिकांनाही इशारा नांदेड जिल्ह्यामध्ये गेल्या ३६ तासांमध्ये पावसाचा जोर कायम असून अजूनही पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील २६ मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातून पाणी सोडले जात आहे. नदी नाले ओसंडून वाहत असून नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमध्ये १२ जनावरे मृत्युमुखी पडली असून २१ घरांची अंशतः पडझड झाली आहे.

आपत्ती व्यवस्थापन, कृषी, पाटबंधारे, महसूल व पोलीस विभाग स्थितीवर लक्ष ठेवून असून ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी आवश्यक साधनसामुग्रीसह तैणात राहण्याची सूचना बचाव पथकांना केली आहे. एनडीआरएफचे पथक तैणात असून कोणत्याही आपत्कालीन स्थितीमध्ये नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान महसूल विभागाच्या सतर्कतेने मुदखेड तालुक्यात पुलावर अडकलेल्या नागरिकाची सुटका करण्यात आली आहे.

शनिवारी सकाळी १० वाजता पासून रविवारी रात्री ७ वाजेपर्यंत पावसाची कुठे दमदार अतिवृष्टी तर कुठे रिपरिप सुरू आहे. सकाळी १० पर्यंत आलेल्या आकडेवारी नुसार जिल्ह्यातील ६३ मंडळांपैकी २६ मंडळांमध्ये ६५ मिली लिटर पेक्षा अधिक पाऊस झालेला आहे. किनवट सारख्या तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाला. रात्री उशिराही पाऊस सुरु आहे. त्यामुळे नदी नाल्यांच्या पाणीपात्रामध्ये वाढ झाली असून नागरिकांनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे असेही जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाच्या पंचनामा पाऊस थांबल्यानंतर करण्यात यावा असे निर्देश प्रशासनाने दिले आहे. प्राथमिक अंदाजानुसार व आकडेवारीनुसार गेल्या २४ तासात झालेल्या अतिवृष्टीमध्ये ६ मोठी दुधाळ जनावरे, ५ छोटी दुधाळ जनावरे, एक बैल मृत्युमुखी पडले आहे तर २१ घरांची अंशतः पडझड झाली आहे.



जिल्ह्यामध्ये २४ तासात सर्वाधिक पाऊस किनवट तालुक्यात झाला आहे. दहा वाजेपर्यंत १३६ मिलिमीटर पाऊस तालुक्यात झाला. तालुक्याच्या सिंदगी, उमरी बाजार व किनवट या मंडळात पावसाचा जोर अधिक आहे. किनवट पाठोपाठ हिमायतनगर, माहूर, हदगाव, भोकर, अर्धापूर, मुदखेड या तालुक्यांमध्ये सध्या पाऊस जोरदार सुरू आहे. नागरिकांनी नाले, ओढे, तलावाच्या भागात जाण्याचे आज टाळावे असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हयातील प्रकल्पामध्ये सततच्या पावसामुळे वाढ होत असून नदी धरणे व बंधाऱ्यांपुढील नदीपात्रानजीक राहणाऱ्या नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आदेश देण्यात आले आहे. गोदावरी नदीवरील दिग्रस बंधाऱ्याचे दोन दारे उघडण्यात आली आहेत. अंतेश्वर बंधाऱ्याची सर्व दारे उघडण्यात आली आहेत. पूर्णा नदीवरील सिध्देश्वर धरणाची दारे उघडली आहेत. त्यामुळे विष्णुपुरी धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह येत असून या बंधाऱ्याचे देखील चार दरवाजे उघडण्यात आले आहेत. विष्णूपुरी धरणाचे आणखी काही दारे उघडली जाऊ शकतात. त्या खालच्या आमदुरा धरणाचे १६ पैकी ११ दरवाजे उघडण्यात आले आहे. त्या खालील बडेगाव धरणाचेही नऊ दरवाजे उघडण्यात आले आहे. अप्पर मानार या धरणातून ६ दरवाजे उघडण्यात आले आहेत.ईसापुर धरणाच्या खालील बाजूस अतिवृष्टी होऊन पैनगंगा नदीपात्रात गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. ईसापुर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून येणारा पाण्याचा येवा सध्या कमी झाला आहे. त्यामुळे धरणा खालील पूरस्थिती नियंत्रित करणे शक्य व्हावे याकरीता सायंकाळी ६ वाजता ईसापुर धरणातून पाणी सोडण्या बाबतचा निर्णय स्थगित करण्यात आला आहे.

धरणामध्ये असणारा सध्याचा साठा. धरणामध्ये येणारा पाण्याचा नवीन प्रवाह. या महिन्यात धरणामध्ये ठेवायचा जलसाठा हे लक्षात घेऊन प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात येतात. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास अधिकअतिवृष्टी झाल्यास अधिक प्रमाणात पाणी सोडले जाऊ शकते. त्यामुळे या सर्व प्रकल्पाच्या खालील बाजूस असणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यातील अंतर्गत वाहणाऱ्या सर्व नद्या तुडुंब वाहत असून नागरिकांनी आवश्यकता नसेल तर पुलावरून पाणी असल्यास पूल ओलांडू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# सकल मराठा समाज बांधव यांच्या वतीने नायगाव येथे दिवंगत.खा.वसंतराव चव्हाण यांच्या शोकसभेचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दिवंगत खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या अकाली निधनामुळे समस्त समाज बांधव आज प्रचंड दुःख सागरामध्ये अस्वस्थ असून,मा.खासदार साहेबांच्या अकाली जाण्यामुळे गोरगरीब वंचित समाजामध्ये प्रचंड पोकळी निर्माण झालेली आहे.जी सर्व समाज बांधवांसाठी प्रचंड हानी आहे.खासदार साहेब म्हणजे सामाजिक चळवळीचे प्रेरणास्थानच होय.खासदार म्हणून निवडून आल्याबरोबर पहिले अधिकृत पत्र राज्यपाल व राष्ट्रपती महोदयांना भेटून मराठा समाजाच्या गोरगरीब सामान्य लोकांना आरक्षणाच्या माध्यमातून न्याय मिळावा यासाठी पत्र दिले आणि आरक्षणाला वाचा फोडली.अशा या निडर लढवय्या लोकनेत्यास आपण मुकलोय.या दुःखामध्ये चव्हाण परिवार यांना भक्कम, साथ देवुन, पाठबळ वाढीसाठी आधाराची नितांत गरज आहे.ज्या गोरगरीब समाजासाठी आजतागायत लढलेले दिवंगत



वसंतरावजी चव्हाण म्हणजे, एक योद्धा जो संकटसमयी लढला..... एक नेता जो लोकहितासाठी मिटला...... असे पंचक्रोशीचे भाग्यविधाते सर्व समाज बांधवांचे प्रेरणास्त्रोत दिवंगत खासदार वसंतरावजी चव्हाण साहेब यांच्या आत्म्यास शांती लाभावी यासाठी प्रार्थना व चव्हाण परिवाराचे सांत्वन करण्यासाठी हजारोच्या संख्येने दिनांक ४/९/ २०२४ बुधवार रोजी दुपारी ठीक १२.३० वाजता अंबिका मंगल कार्यालय नायगाव येथे शोकसभेसाठी आपण उपस्थित राहावे असे आवाहन शोकाकुल समस्त सकल मराठा समाज तालुका नायगाव बा.यांनी केले आहे.

# भादलवाडी तलाव शेतकरी आणि मच्छीमारां साठी वरदान : माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील

## हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते तलावात मत्स्यबीज सोडले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भादलवाडी तलाव हा खडकवासला कालव्यामधून आपण सर्वांनी प्रयत्नांची पराकाष्टा करून १००% क्षमतेने भरून घेण्यात आला आहे. गेली १० वर्षांमध्ये या तलावावरील शेतकरी, मच्छिमार यांच्यावर पाण्याअभावी अन्याय होत होता.कर्मयोगी शंकररावजी पाटील भाऊ यांनी दुष्काळामध्ये बांधलेला भादलवाडी तलाव हा शेतकरी,मच्छीमारांसाठी वरदान ठरला आहे.असे प्रतिपादन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील



यांनी रविवारी (दि.१) केले.

भादलवाडी (ता.इंदापूर) येथील तलावाच्या पाण्याचे जलपूजन व मत्स्यबीज सोडण्याचा कार्यक्रम हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते रविवारी संपन्न झाला.सदर प्रसंगी हर्षवर्धन पाटील यांनी तलाव पूर्ण क्षमतेने भरल्या बद्दल आनंद व्यक्त केला.प्रत्येक वर्षी तलाव भरला जावा व परिसरातील शेतकरी,मच्छीमार भोई समाज आनंदी राहावा,अशी सदिच्छा व्यक्त केली.

या तलावाचा डाळज,भादलवाडी,कुंभारगाव, पिलेवाडी,तक्रारवाडी आदी परिसरातील शेतकरी व नागरिकांचा फायदा होत आहे.या तलावाच्या पाण्यावरती नळ पाणीपुरवठा योजनाही अवलंबून आहेत.आज तलावामध्ये मत्स्यबीज सोडण्याचा आले असून,त्यामुळे मच्छीमार संस्थांना फायदा होणार आहे.त्यासाठी मत्स विभागाचे सहकार्य लाभल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.या जल पुजन व मत्स्यबीज सोडण्याच्या कार्यक्रमास पदाधिकारी,अधिकारी,कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्य रत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांची जयंती दर वर्षी प्रमाणे याही वर्षी मोठया उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद - साहित्यरत्न,बहुजन नायक,डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती आतकूर येते मोठ्या साजरी करण्यात आली. बहुजन नायक डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प पूझा करून अर्पण अभिवादन करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तंटामुक्ती अध्यक्ष लक्ष्मण दारमोड हे होते.ध्वजारोहण गावचे पोलीस पाटील लिंगान्ना दारमोड व माझी सरपंच प्रतिनिधी शंकर मोहनाजी दारमोड यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून समाज भूषण पुरस्कार प्राप्त दिनेश दारमोड महाराष्ट्र राज्य पुरस्कार शिक्षक पुरस्कार प्राप्त गंगाधर वाघमारे सरपंच प्रतिनिधी हिराकांत वाघमारे सह माजी



सभापती नागोराव जटाळकर,माजी सरपंच गंगाराम रेड्डी जटाळकर संतोष बैलकर, साहेबराव जटाळकर,बाबुराव डाकोरे मोतेवार शिवकांत,साईनाथ इंगळे,रामा बैलकर,विशाल जटाळकर, प्रदीप जटाळकर,विकास जटाळकर व समस्त गावातील प्रतिष्ठित नागरिक व समाजामधील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार गणेश जटाळकर यांनी केले. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर छोटासा बालक वेदांत जटाळकर हे यांच्या जीवन चरित्रावर भाषण केले. व समाज बांधवांनी व तसेच सर्व गावकऱ्यांनी मिळून सायंकाळी च्या वेळेस डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला गावातील मुख्या रस्ताने मोठया उत्साहात काढण्यात आला.

# सरस्वती विद्यालय व सरस्वती इंग्लिश स्कूल या शाळेच्या दोन विद्यार्थ्यांची MBBS.साठी निवड

## शाळेच्या वतीने गावकऱ्यांच्या वतीने पंचक्रोशीतून त्यांचे कौतुक करण्यात आले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

पिंपळगाव रेणुकाई येथील सरस्वती विद्यालय व सरस्वती इंग्लिश स्कूल च्या दोन विद्यार्थ्यांची एमबीबीएस साठी निवड झालेली आहे, महेश विनोद पवार, राहणार दानापूर या विद्यार्थ्यांची निवड गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज नागपूर, तसेच प्रणव विजय देशमुख राहणार पिंपळगाव यांची निवड धुळे मेडिकल कॉलेज साठी झाली यांचा स्वभाव अतिशय प्रामाणिक व अभ्यासू विद्यार्थी मनामध्ये जिद्द व चिकाटीमुळे आई-वडिलांचे कष्ट व हलाखीची परिस्थिती असताना सुद्धा महेश आणि प्रणव यांनी आपल्या आई-वडिलांचा परिस्थितीचा विचार करून रात्र चा दिवस





व दिवसाची रात्र करणारा माझा मायबाप आपल्या साठी रात्रंदिवस झुंजणारा प्रत्येक आई-वडिलांचे स्वप्न असतात आपलं लेकरू कोणत्या ना कोणत्या मोठ्या पदावर जावं यातच आई-वडिलांचा आनंद असतो या परिस्थितीचा विचार करून या विद्यार्थ्यांनी वेळ न वाया घालता अभ्यासाकडे लक्ष देऊन या पदापर्यंत पोहोचले. शाळेचे अध्यक्ष राजेंद्रजी देशमुख, पालक एन एम लोखंडे सर, प्रशासकीय अधिकारी ए.के बावस्कर सर, सेमी मुख्याध्यापक डी टी खंडाळकर सर, इंग्लिश माध्यम मुख्याध्यापक गोरे सर, उपमुख्याध्यापक मनोज देशमुख सर, प्राध्यापक राम शिंदे, व शाळेचा पूर्ण स्टॉप गावातून व पंचक्रोशीतून त्यांचे कौतुक करण्यात आले व पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिल्या..

# बाहेर गावाहून आलेल्या प्रवाशांना धर्मवीर ॲड.ठाकूर यांच्या वतीने शंभर छत्र्याचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

रविवारी सकाळपासूनच नांदेड शहरात मुसळधार पाऊस सुरू असल्याची कल्पना नसल्यामुळे बाहेरगावाहून आलेल्या एसटीतील महिला प्रवाशांना धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांनी शंभर छत्र्या दिल्या असून अनपेक्षितपणे मोफत छत्र्या मिळाल्याचे पाहून भिजणाऱ्या महिलांनी समाधान व्यक्त केले

पावसात सर्वजण आराम करत असताना दिलीप ठाकूर यांनी समाजसेवेचा वसा सुरू ठेवत संतोष भारती यांच्यासोबत बसस्थानक गाठले. मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळे नांदेड बस स्थानकावर एसटीतून उतरलेल्या महिला प्रवाशांची तारांबळ उडत होती. सोबत असलेल्या लहान मुलांना भिजण्यापासून वाचविण्याचा केविलवाणा प्रयत्न महिला करत होत्या. स्वतः जवळचे सामान घेऊन पावसात चालणे त्यांना अवघड होत होते. अशा परिस्थितीत दिलीप ठाकूर हे सर्वांना छत्री देत होते. अनोळखी व्यक्तीकडून छत्री घेण्यास काही भगिनी संकोच करीत होत्या. परंतु दिलीप ठाकूर यांनी त्यांना एका भावाकडून ही भेट असल्याचे सांगितल्यामुळे त्यांनी छत्र्या घेतल्या. ध्यानीमनी नसताना अचानक छत्री मिळाल्यामुळे महिला भगिनींच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव पसरले. गेल्याच आठवड्यात आंतरराष्ट्रीय कथाकार पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिव महापुराण कथेसाठी बाहेर गावाहुन आलेल्या शिवभक्तांना देखील दिलीप ठाकूर यांनी छत्र्या दिल्या होत्या. रविवारी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ महा आघाडीच्या नेत्याविरुद्ध पावसात आंदोलन करणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांना देखील दिलीप ठाकूर यांनी महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांच्या हस्ते छत्र्याचे वाटप केले.

भाजपा महानगर नांदेड व लायन्स क्लब नांदेड सेंट्रल च्या वतीने सतत पाचव्या वर्षी कृपाछत्र हा उपक्रम सुरू आहे. जितके वर्ष तितक्या छत्र्या वाटपाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. आतापर्यंत ५९८ छत्र्या वाटप



करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नाव न छापण्याच्या अटीवर एका दात्याने १०० छत्र्यासाठी देणगी दिलीप ठाकूर यांना दिलेली आहे.दिलीप ठाकूर यांच्यातर्फे ५०,चंद्रकांत गंजेवार याच्या तर्फे ४८ तर हॉटेल मिडलँड गोकुळनगर नांदेड व स्नेहलता जायसवाल हैदराबाद यांच्यातर्फे प्रत्येकी ३२ छत्र्या मिळाल्या आहेत. प्रत्येकी १६ छत्र्या देणाऱ्या मध्ये प्रमिला भालके, डॉ. गोविंद भाकरे,एक राम भक्त,अशोक पडगीलवार, रुहिका मुत्तेपवार, सुरेश पळशीकर,आनंद साताळे, ला. शिवाजीराव पाटील,मोहित व रेणुका सोनी, निर्मला द्वारकादास अग्रवाल,अबीरा पवार,वंदना शेळके परभणी,श्रीमती प्रतिमा चेरेकर हैदराबाद,किशनराव रामपल्ली,सुरेश लोट, सविता अरुणकुमार काबरा,सुरेश शर्मा, कामाजी सरोदे, संतोष भारती, राजेशसिंह ठाकूर,महंत कैलास महाराज वैष्णव यांचा समावेश आहे. उद्दिष्ट पूर्तीसाठी १४२७ छत्र्यांसाठी दात्यांची आवश्यकता आहे.सफाई कामगार, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, वृत्तपत्र विक्रेते, रस्त्यावरील बेघर यांना छत्र्या वाटप करण्यात येणार आहेत.छपाईच्या शुल्कासह किमान १६ छत्र्यासाठी रू.२५०० देणगी स्वीकारण्यात येत आहे . देणगी देणाऱ्यांची नावे छत्र्यांवर रबर प्रिंटिंग द्वारे छापण्यात येणार आहेत. ज्यांनी जितक्या छत्र्या दिल्या तितक्या छत्र्यांचे वाटप त्याच देणगीदारांच्या हस्तेच करण्यात येणार आहे. देणगीदारांची माहिती सोशल मीडिया च्या मार्फत पन्नास हजार लोकापर्यंत प्रसिद्ध केली जाणार आहे.तरी दानशूर नागरिकांनी कृपा छत्र उपक्रमाला भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन संयोजक दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# जीवनाचा मंत्र सांगणाऱ्या–त्या तरूच्या सावलीला–च्या काव्यगायनाने भारावले नगरचे, वंजारी समाजाचे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । ज्ञानेश्वर बुधवत**

नुकत्याच दि. २५-०८-२०२४ रोजी येथील स्थानिक संत भगवानबाबा चौकातील गंगा लॉन्स च्या भव्य सभागृहात, वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य साहित्य आघाडीच्या वतीने आयोजित, वंजारी समाजाच्या दुसऱ्या एकदिवसीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ कवी डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली यांच्या अंतर्राष्ट्रीय ख्याती प्राप्त – त्या तरूच्या सावलीला, चल सखे बोलू जरा – या मर्मभेदी कवितेच्या, त्यांच्याच सुमधुर आवाजातील गायनाने सारे सभागृह भारावून गेले. प्रा. संगीता घुगे यांच्या अध्यक्षतेखाली, मावळते अध्यक्ष मा. प्रा. वा.ना.आंधळे, स्वागताध्यक्ष अंतर्राष्ट्रीय कुस्ती पटू मा. राजकुमार आघाव, अहिल्यानगर, सहस्वागताध्यक्ष मा. रेणूका वराडे, वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मा. गणेशजी खाडे, अहिल्यानगरचे





लोकप्रिय आमदार तथा प्रमुख अतिथी मा. संग्रामभैया जगताप इ. दिग्गजांच्या प्रमुख उपस्थितीत तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, ( औरंगाबाद ) छ. संभाजीनगर चे महाराष्ट्र राज्य राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य मा. प्रा. डॉ.गजाननराव सानप यांच्या शुभहस्ते उदघाटन झालेल्या या भव्यदिव्य साहित्य संमेलनात वास्तविक कुठलाही सहभाग नसताना, बुलढाणा जिल्ह्यातील नुकत्याच सुरू झालेल्या पण अल्पावधीतच अटकेपार घोडदौड करणाऱ्या सिंदखेड राजा येथील दै. लोकनेता चा संपादक असलेल्या तरूणतुर्क आयुष्मान ज्ञानेश्वर बुधवतला संपादकीय प्रभावी कार्यासाठी या संमेलनात राज्यस्तरीय व बहुमानाचा राष्ट्रसंत भगवानबाबा समाज प्रबोधन महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान होणार असल्याकारणाने, मित्राच्या त्या ऐतिहासिक सन्मान सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी परकायाप्रवेशी कथाकथनास्तव साऊथवर्स्टर्न अमेरिकन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त सुप्रसिद्ध कथाकार डॉ. बबनराव महामुने तथा भावकवी आयुष्मान अंकुश पडघान यांच्या सह आकस्मिक आलेले असतांना, छ. संभाजीनगर चे ज्येष्ठ साहित्यिक मा. प्रा. डॉ. रामकिसन दहिफळे यांच्या आग्रहाखातर डॉ. विजयकुमार कस्तुरे यांना आपल्या उपरोक्त कविता गायनाची तथा डॉ. महामुने यांना त्यांच्या कथाकथनाची संधी, आयोजकांकडून पाहूणे कलावंत म्हणून मिळाली आणि उभयतांनी आपापल्या सादरीकरणाने सबंध संमेलन गाजविले अन् उपस्थित सर्व साहित्य रसिकांनी टाळ्यांच्या गजराने सभागृह दणाणून सोडले. तद्वतच सादर सत्कार करून सन्मानित केले.

# जि.प.प्राथमिक शाळा भट गल्ली पाटोदा शाळेत दहीहंडी उत्सव साजरा

## विद्यार्थ्यांनी केली श्रीकृष्ण–सुदामा मित्र प्रेम नाटिका सादर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**पाटोदा । प्रतिनिधी**


पाटोदा शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भट गल्ली पाटोदा या शाळेत दिनांक २९/०८/२०२४ गुरुवार रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी व दहिहंडी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या जन्माष्टमीच्या महोत्सवात शाळेतील सर्व विद्यार्थ्यी, विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता. या मध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकृष्णा चा जन्म, बालपण, सवंगडी, राधा – श्रीकृष्णांच नात, सुदामा आणि श्रीकृष्णाच नातं अगदी सहज आणि उत्कृष्टरीत्या सादर करण्यात आले. या वेळी अनेक विद्यार्थी श्रीकृष्ण बनून तर कोणी राधा सुदामा बनून आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक



श्री.येवले सर, सुतार मॅडम, भालेकर मॅडम, यांनी खूप परिश्रम घेतले. दहिहंडी उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला या वेळी शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# हिंगोली जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यासह व्यापाऱ्याचे मोठे नुकसान





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली जिल्ह्यांमध्ये मध्यरात्रीपासून पावसाने जोरदार हजेरी लावल्याने कयाधू नदीला पूर येऊन शेतकऱ्याच्या पिकाचे मोठे नुकसान झाले तर गावामध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्याचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे तर नदीकाठील शेतकऱ्याच्या पिकाऊन पाणी गेल्याने पिकाची मोठी नास दुषी झाली आहे यामध्ये सोयाबीन तूर हळद कापूस मूग उडीद व इतर पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हवालदीत झाला आहे तर मुख्य बाजारपेठेला देखील या पुराच्या पाण्याचा मोठा फटका बसला आहे सेनगाव हिंगोली व हिंगोली रिसोड , जिंतूर गोरेगाव महामार्गावरील कयाधू नदी वरील पुलाला पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला होता, कोणताही उंचीत प्रकार घडू नये याकरिता सेनगाव पोलीस स्टेशनच्या वतीने कयाधू नदीवर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता पुलावरून पाणी वसरल्याने वाहतूक करणाऱ्या प्रवाशांना वाहने काढण्यास परवानगी देण्यात आली होती.

# शिराढोण मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी शुभम डांगे तर सचिव पदी सुनील भुरे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

शिराढोण पत्रकार संघाची नुकतीच एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीत अध्यक्ष व सचिवांची निवड करण्याचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. यावेळी अध्यक्ष म्हणून शुभम मारोतराव डांगे तर सचिव म्हणून सुनील कोंडीबा भुरे यांची एकमताने निवड करण्यात आली.

आगामी काळात पत्रकार संघटनेच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न आपल्या लेखणीच्या माध्यमातून सोडविण्याचा कसोशीने प्रयत्न केला जाईल . लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून





लेखणीला गणले जाते . या लेखणीच्या माध्यमातून डोंगरदऱ्यातील गोरगरिबांचे प्रश्न शासन दरवाजापर्यंत पोहोचण्याचे काम शिराढोण पत्रकार संघ केले जाईल . असे नूतन अध्यक्ष शुभम डांगे यांनी पुढे बोलतांना सांगितले.

त्यांचबरोबर शिराढोण विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाच्या निवडीमध्ये उपाध्यक्ष म्हणून गौस शेख, कार्याध्यक्ष साईनाथ केते, सहसचिव सुनील राघोजी जमदाडे, कोषाध्यक्ष शिवकांत कोंडिबा डांगे, सहकोषाध्यक्ष दौलत उत्तमराव पांडागळे, मार्गदर्शक देवराव नागोराव पा. पांडागळे , संगमेश्वर शिवराज बाच्चे सर, संतोष किशनराव क-हाळे यांची निवड करण्यात आली.

त्यांच्या निवडी बद्दल कंधार तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष बालाजीराव पांडागळे, कंधार अभिवक्ता संघाचे अध्यक्ष तथा दैनिक देशोन्नती चे तालुका प्रतिनिधी ड.दिगंबर गायकवाड, सरपंच खुशालराव पांडागळे, माजी उपसरपंच साईनाथ पाटील कपाळे , गणेश लोखंडे , ( अध्यक्ष उस्माननगर विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघ) , माणिक भिसे ( उपाध्यक्ष उस्माननगर विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघ ) दैनिक लोकनेता नांदेड जिल्हा प्रतिनिधी पत्रकार बाजीराव पाटील गायकवाड सह उस्माननगर, मारतळा विभाग ग्रामीण मराठी पत्रकार संघाकडून व मित्र परिवाराकडून शुभेच्छा देऊन अभिनंदन होत आहे.

# पावसाळी क्रिडा स्पर्धेत दुर्गामाता विद्यालयाचा डंका

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील सोयगाव देवी येथील दुर्गामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सोयगाव देवी येथील खेळाडू तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत १७ वयोगटातील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला तसेच १७ वयोगटातील मुलीच्या संघाने सुद्धा प्रथम क्रमांक मिळवला व १४ वयोगटातील मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळून विद्यालयाचे नाव उज्वल केले या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी सभापती एल के दळवी साहेब, माजी सरपंच सौ कासाबाई लक्ष्मणराव पाटील दळवी, प्राध्यापिका गीताताई गावंडे, योगेश पाटील




दळवी, दिनेश पाटील दळवी संस्थेचे प्रशासकीय प्रमुख आनंद वाघसर, विद्यालयाचे प्राचार्य डी बी बोर्डे सर तसेच क्रीडा शिक्षक कैलास दळवी सर नितीन राठोड सर तसेच तालुका क्रीडा संयोजक कृष्णा पाटील जंजाळ पाटील सर किरण साळवे ,अजय मतकर यांनी खेळाडूचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या

# बीड येथील नागापूर येथील वाण धरण ओव्हर फ्लो नदीकिनारी असणाऱ्या शहर व वाडी वस्त्यांना सतर्कतेचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड जिल्ह्यातील नागापूर येथील वाण धरण ओव्हर फ्लो नदीकाठी वसलेल्या शहर व वसत्या पंधरा ते वीस गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला परळी आहे,तालुक्यात अनेक ठिकाणी २४तास पावसाची संततधार हजेरी वडे नदी नाले तुडुंब भरून वाहत असून नदी काठी जनावराचे गोठे किंवा घरे असतील त्यांना नगरपालिका, उपविभागीय अधिकारी ग्रामीण व शहर पोलीस यांनी सतर्कतेचा इशारा दिला, उद्या बैल पोळा हा शेतकरी राजाचा वार्षिक अतिउत्साही सण मानला जातो वरूणराजाचे आगमनात आज खांदे मळण, उद्या सकाळी लवकर उठणे आपल्या सरज्या राजाला नदीला आंघोळ घालून सिंग कलर करणे झूली घुंगराचा साज घालणे, त्याला खाण्यास पुरण पोळी बनवने व दुपारी नंतर त्यांना हनुमान मंदिरास पाच फेरे मारून लग्नाला सर्व शेतकरी एका जागेवर जमा होऊन त्यांना चावूर, चावूर, चांगभलं म्हणत, त्याच्या लग्नाला सुरवात करून बैल पोळा सण अति उत्साह पणे साजरा करनार असून राज्याच्या विविध भागात आज



पावसाच्या सरी तर काही भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे, वरुण राजा हा दरवर्षी हजेरी लावून बळीराजाच्या या महत्व पूर्ण उत्साहात भाग घेत असलेले पाहाव्यास मिळत असते, परंतु यावेळी थोडया मोठया प्रमाणात बैल पोळा सण साजरा होणार अंदाज आहे, आज सम्पूर्ण बीड जिल्ह्यातील नागरिकांना सूर्यदर्शन घडले नसल्याचे पाहावयास मिळाले आहे, ढगालमय आनंदमय वातावरनात खांदे मळण करण्याची वेळ बळीराजावर आली आहे,मनासारख्या पावसामुळे यंदाचा बैल पोळा हा सण जोरदार साजरा होणार असल्याचे संकेत आहेत, या वर्षी वरुण राजाने बळीराजा सुखी समाधानी राहावा यासाठी चारा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार नसल्याने बळीराजा हा उद्याचा उत्सव मोठया उत्साहात साजरा करणार,

# जिल्हास्तरीय सायकल स्पर्धेत चैतन्याच्या नऊ विद्यार्थ्यांची विभाग स्तरासाठी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्यावतीने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेत चैतन्य विद्यालयाच्या नऊ विद्यार्थ्यांची विभागीय स्तरावर निवड झाल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना सायकलिंग स्पर्धेसाठीचे मार्गदर्शक आणि विद्यालयाचे क्रीडा शिक्षक अमित झरेकर म्हणाले की,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे व जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांचे वतीने पळसदेव तालुका इंदापूर येथील श्री पळसनाथ प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जिल्हास्तरीय सायकलींग स्पर्धेचे आयोजन केले होते.चैतन्य विद्यालयाने या स्पर्धेत घवघवीत यश मिळवून पुणे जिल्ह्यात



आपला दबदबा निर्माण केला आहे.विद्यालयाच्या तब्बल नऊ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सोळा पदके जिंकली. या नऊ विद्यार्थ्यांची विभाग स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे, रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे, पंकज घोलप, संजय हिरे, अनिल उकिरडे, संतोष सोनवणे व परिसरातील सायकल प्रेमींनी अभिनंदन केले आहे. विजेते खेळाडू खालील प्रमाणे –

१४ वर्षे मुली

१) वैष्णवी अमोल टिकेकर
मास स्टार्ट – प्रथम क्रमांक
टाईम ट्रायल – प्रथम क्रमांक

१४ वर्षे मुले

२) दर्शन रमेश पवार
टाईम ट्रायल – प्रथम क्रमांक
मास स्टार्ट – द्वितीय क्रमांक

३) प्रदीप प्रकाश पोगाके
टाईम ट्रायल – द्वितीय क्रमांक
मास स्टार्ट – तृतीय क्रमांक

१७ वर्षे मुली

४) ध्रुवी योगेश शेटे
मास स्टार्ट – द्वितीय क्रमांक

५) पायल सचिन बोचरे
टाईम ट्रायल – द्वितीय क्रमांक
मास स्टार्ट – तृतीय क्रमांक

१९ वर्षे मुली

६) नेहा दीपक फापाळे
मास स्टार्ट – प्रथम क्रमांक
टाईम ट्रायल – द्वितीय क्रमांक

७) राजेश्वरी रमेश पवार
मास स्टार्ट – द्वितीय क्रमांक
टाईम ट्रायल – तृतीय क्रमांक

१९ वर्षे मुले

८) ओमकार अमोल टिकेकर
टाईम ट्रायल – प्रथम क्रमांक

९) किशोर नामदेव गोडे
मास स्टार्ट – द्वितीय क्रमांक
टाईम ट्रायल – तृतीय क्रमांक

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904